महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

Rs.2/-

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

बुधवार ■ २०ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५९



# राज्यासह मुंबई ठाण्यात पावसाचे थैमान

## ठाणे जिल्ह्यातील उल्हास, काळू, भातसा नद्यांना पूर



दहागांव येथील बारवी नदीवरील पूल पाण्याखाली टिटवाळा बदलापूर दळणवळण सेवा ठप्प



## ठाण्याला पावसाने धो धो धुतले

### शहरातील रस्त्यांना नदीचे स्वरूप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मागील दोन दिवसांपासून ठाणे शहरात पडत असलेल्या पावसामुळे ठाणे जलमय झाले असून शहरातील अनेक रस्त्यांना नदीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसत होते. ठाणे शहरात सोमवारी १०३ मिली पावसाची नोंद झाली. तीन दिवसांच्या सुट्टीनंतर कामावर जाणाऱ्या ठाणेकरांचे फारच हाल झाले. ठाणे-कासारवडवली मार्गावर वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली, तर दुसरीकडे कामण भिवंडी राज्य महामार्गाच्या वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला आहे. महामार्ग शेजारील पाण्याचा निचरा होण्याचे मार्ग बंद असल्यामुळे रस्त्यावर पाणी साचून वाहतूक ठप्प झाले आहे ज्यामुळे महामार्गावर लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. वसई पूर्वेतून कामण भिवंडी राज्य महामार्ग गेला आहे. ठाणे तसेच भिवंडी येथून प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी तसेच अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी हा मार्ग महत्त्वाचा समजला जातो. मात्र गेल्या काही वर्षात रस्त्याच्याशेजारी असणाऱ्या गटारांवर झालेले अनधिकृत बांधकाम, माती भराव यामुळे पाण्याचा निचरा होण्याचे मार्ग बंद झाले आहेत.

ठाण्या मुंबईसह वसई-विरारमध्ये गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, याचा थेट परिणाम पश्चिम रेल्वेच्या लोकल सेवेवर झाला आहे. नालासोपारा येथे रुळांवर पाणी साचल्यामुळे आणि वसई रेल्वे स्थानकात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे वसई ते विरार दरम्यानची लोकल सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. सकाळपासून लोकल उशिराने धावत होत्या, पण दुपारनंतर पावसाचा जोर वाढल्यामुळे ही सेवा पूर्णपणे थांबवण्यात आली.





## भातसा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

भातसा धरणक्षेत्रात गेल्या ४८ तासांत संततधार पर्जन्यवृष्टी सुरू आहे. यामुळे धरणाचे पाच दरवाजे मंगळवारी (ता. १९) दुपारी ४.३० उघडण्यात आले आहेत. भातसा धरणाची पाणी पातळी मंगळवारी १३९.७० मीटर इतकी असून, धरणाच्या जलग्रहण आणि लाभ क्षेत्रात सततचा पाऊस पडत आहे. पाण्याचे प्रमाण वाढत असल्यामुळे धरणाची पाच वक्रद्वारे या आधी ०.५० मीटरने उघडण्यात आली होती. मात्र, मंगळवारी दुपारी ४.३० वाजता पाच वक्रद्वारे ०.२५ मीटरने आणखी वाढवून एकूण ०.७५ मीटरने उघडण्यात आली. परिणामस्वरूप भातसा धरणातून ६६.२५ क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग प्रवाहीत करण्यात येत आहे. यामुळे भातसा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

थोडक्यात महत्वाचे

## मुंब्रा स्थानकात थांबणार १५ डब्यांची लोकल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. १९ :** मुंब्रा स्थानकावरील प्रवाशांना लवकरच मोठा दिलासा मिळणार आहे. मध्य रेल्वेकडून येत्या काही महिन्यांत १५ डब्यांच्या लोकल गाड्यांना थांबा देण्यासाठी प्लॅटफॉर्म क्रमांक एक, दोन आणि तीनच्या विस्ताराचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर १५ डब्यांच्या लोकलला मुंब्रा स्थानकावर थांबा मिळेल.

मुंब्रा परिसर झपाट्याने विकसित होत आहे. नव्या गृहनिर्माण प्रकल्पांसह शैक्षणिक संस्था आणि रोजगाराच्या संधींमुळे रोज हजारो प्रवासी येथे चढ-उतार करतात; मात्र आतापर्यंत फक्त १२ डब्यांच्या धीमी लोकलच थांबत असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. दिवा, ठाणे, कल्याण, बदलापूर, अंबरनाथ आणि उल्हासनगरसारख्या भागांतून अनेक प्रवासी मुंब्र्यात उतरणारे आहेत. त्यामुळे येथे जलद लोकलनाही थांबा द्यावा, अशी मागणी प्रवासी संघटनांकडून सातत्याने होत आहे. मुंब्र्यातील प्रवाशांना दररोज उलट दिशेचा प्रवास करून मुंबईकडे जाणारी लोकल पकडावी लागते. अनेक प्रवासी सकाळी प्रथम कल्याणकडे जाऊन नंतर मुंबईकडे येतात. यात त्यांचा वेळ, पैसे वाया जातो. १५ डब्यांच्या लोकलना थांबा मिळाल्यास या प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

## रुळांवर पाणी साचल्याने ठाणे-सीएसएमटी रेल्वे सेवा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मागील दोन दिवसापासून सुरु असलेल्या पावसामुळे मध्य रेल्वेची सेवा विस्कळीत झाली असून ठाणे-सीएसएमटी रेल्वे सेवा तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याचा निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने घेतला आहे.


ठाणे स्थानकात अडकलेल्या खोपोली, कर्जत, कसारा, कल्याण भागातील प्रवाशांसाठी विशेष शटल सेवा रेल्वे प्रशासनाने सुरू ठेवल्या आहेत. लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांनी प्रवास करणारे प्रवासी देखील ठाणे स्थानकात रेल्वेगाडीच्या प्रतिक्षेत असल्याचे चित्र होते.

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका मध्य रेल्वे मार्गावर बसला आहे. मुंबई उपनगरात ठिकठिकाणी पावसामुळे रुळांवर पाणी साचल्याने रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे.

त्यामुळे ठाणे ते सीएसएमटी या महत्त्वाच्या मार्गावरील रेल्वे सेवा तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला.

या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे ठाणे, मुलुंड, भांडुप, विक्रोळी, घाटकोपर, कुर्ला तसेच मुंबईच्या इतर महत्त्वाच्या स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी उसळली होती.

## मुसळधारीने जिल्ह्यातील मूर्तिकारांचे कोट्यवधींचे नुकसान



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे अवघ्या आठ दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला आहे. त्यामुळे मूर्तीकारांची गणेश मूर्ती घडविण्याची लगबग सुरु आहे. त्यातच, ठाणे शहरात मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाचे पाणी माजिवडा भागात असलेल्या एका गणपतीच्या कारखान्यात शिरले. यामुळे कारखान्यातील गणेशमूर्तीचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून यामध्ये शाडू माती आणि पीओपी मूर्तीचा समावेश होता. यातील सर्वाधिक मूर्ती बुकिंगच्या होत्या आणि त्या मूर्तीचे ९० टक्के काम पूर्ण झाले होते. यामुळे गणेश मूर्तीकार हतबल झाले असून आता ग्राहकांना काय उत्तर द्यायचे असा प्रश्न त्यांच्या समोर निर्माण झाला आहे.

ठाणे शहरात गेले दोन दिवसांपासून पाऊस पडत आहे. मंगळवारी पहाटे पासून मुसळधार पावसाने ठाणे शहरात हजेरी लावली. या पावसामुळे अनेक सखल भागात पाणी साचले होते. तसेच काही रस्त्यांनाही नदीचे स्वरुप प्राप्त झाले होते. यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण झाला. तर, अनेक घरांमध्येही पावसाचे पाणी शिरले होते. या दरम्यान, माजिवडा भागातील एका गणपती कारखान्यात देखील पाणी शिरले. या पाण्यामुळे कारखान्यातील गणेशमूर्तीचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले.

## सर आली धावून - पूल गेला वाहून

### मुसळधार पावसाने बदलापूरातील मांजर्ली नाल्यावरील पुलाला जलसमाधी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** बदलापूर शहरात दोन दिवस सलग झालेल्या मुसळधार पावसात शहरातील सर्वात मोठा नैसर्गिक नाला असलेल्या मांजर्ली नाल्याची पाणी पातळी वाढली होती. या पाण्यात मंगळवारी पश्चिमेत शनिनगरकडे जाण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात तयार करण्यात आलेला नाल्यावरील पूल वाहून गेला आहे.

## बारवी धरणातून पाण्याचा विसर्ग वाढला उल्हास नदीच्या पाणी पातळीत वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** मुसळधार पावसामुळे ठाणे जिल्ह्याची तहाण भागवणाऱ्या बारवी धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्याचे समोर आले आहे. सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास बारवी धरणातून २८ घनमीटर प्रति सेकंद पाण्याचा विसर्ग सुरू होता. तर दुपारी २ वाजेपर्यंत हा विसर्ग वाढला. हा विसर्ग १८२ घनमीटर प्रति सेकंद वाढल् याची माहिती बारवी धरण कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे. धरणातून होणारा विसर्ग वाढल्याने बारवी नदीच्या पाणी पातळीतही वाढ झाली आहे. येथील ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे. बारवीतून होणारा विसर्ग, कर्जत, माथेरान भागातून होणाऱ्या पावसामुळे पर्यायाने उल्हास नदीच्या पाणी पातळीतही वाढ नोंदवली जाते आहे.



## कल्याणच्या ग्रामीण भागात ठाकरे गटाला खिंडार

### उप जिल्हाप्रमुख सदाशिव सासे, जि. प. सदस्या जयश्री सासे, सुवर्णा भगत यांच्यासह शेकडो कार्यकर्ते भाजपात



### प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते पक्षप्रवेश

.......................


### आ. किसन कथोरे यांची उपस्थिती



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण दि 19 :** कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शेकडो पदाधिकाऱ्यानी प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते व आमदार किसन कथोरे च्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला,भाजपाच्या विचारांनी प्रेरित होऊन व मुरबाड विधानसभा आमदार मा. श्री. किसनजी कथोरे साहेबांच्या मार्गदर्शनाने ठाणे ग्रामीणचे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ठाणे जिल्हा ग्रामीण चे उपजिल्हाप्रमुख श्री. सदाशिव सासे, ठाणे जिल्हा परिषद सदस्या सौ. जयश्री सासे, अंबरनाथ मधील जिल्हा परिषद सदस्या सुवर्णा राऊत, किरण राऊत यांच्या सह उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपतालुका प्रमुख श्री. कैलास धुमाळ, तालुका समन्वयक श्री. प्रदीप वारे, जेष्ठ कार्यकर्ते श्री. अनंता जाधव, चेअरमन रायते सेवा सहकारी संस्था सौ. निर्मला सासे, संचालक कुंदा सेवा सहकारी संस्था श्री. शिवाजी भोईर, सामाजिक कार्यकर्ता श्री. शरद सासे, सदस्य ग्रुप ग्रामपंचायत आह्वे भिसोळ सौ. जिजाबाई वाघमारे व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्वांनी आज मुंबई येथील भाजप प्रदेश कार्यालयात भाजप प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रविंद्रजी चव्हाण साहेब यांच्या हस्ते भारतीय जनता पार्टीत जाहीर पक्ष प्रवेश केला. या प्रसंगी मा. आमदार श्री. किसनजी कथोरे साहेब, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती श्री. रविंद्रजी घोडविंदे सर, संचालक टीडीसी बँक ठाणे श्री. राजेशजी पाटील, भाजपा अध्यक्ष कल्याण ग्रामीण श्री. शेखर लोणे, समाजसेवक श्री. दिनेशजी कथोरे, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती कल्याण श्री. योगेशजी धुमाळ, भाजपा उपतालुका प्रमुख श्री. पद्माकरजी हरड, भाजपा कल्याण ग्रामीण सरचिटणीस श्री. नेताजी भोईर, युवा कार्यकर्ता श्री. सुयोग मगर तसेच भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





# गीतासार



### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया । विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ १८-६३ ॥

अशा प्रकारे हे गोपनीयाहूनही अतिगोपनीय ज्ञान मी तुला सांगितले. आता तू या रहस्यमय ज्ञानाचा संपूर्णपणे चांगला विचार करून मग जसे तुला आवडेल तसे कर. ॥ १८-६३ ॥

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः । इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥ १८-६४ ॥

सर्व गोपनीयांहून अतिगोपनीय माझे परम रहस्ययुक्त वचन तू पुन्हा ऐक. तू माझा अत्यंत आवडता आहेस, म्हणून हे परम हितकारक वचन मी तुला सांगणार आहे. ॥ १८-६४ ॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु । मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ १८-६५ ॥

तू माझ्या ठिकाणी मन ठेव. माझा भक्त हो. माझे पूजन कर आणि मला नमस्कार कर. असे केले असता तू मलाच येऊन मिळशील. हे मी तुला सत्य प्रतिज्ञापूर्वक सांगतो. कारण तू माझा अत्यंत आवडता आहेस. ॥ १८-६५ ॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ १८-६६ ॥

सर्व धर्म म्हणजे सर्व कर्तव्यकर्मे मला अर्पण करून तू केवळ सर्वशक्तिमान, सर्वाधार अशा मला परमेश्वरालाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून सोडवीन. तू शोक करू नकोस. ॥ १८-६६ ॥

**रेसिपी**

## दोडक्याच्या शिरांची चटणी



साहित्य : दोडक्याच्या शिरा
लसूण पाकळ्या- 4
सुकं किसलेलं खोबर- 2 टेबलस्पून,हिरव्या मिरच्या- 2
जिरे- पाव टेबलस्पून,शेंगदाणा कूट- 2 टेबलस्पून,
तीळ- 1 टेबलस्पून,मीठ,तेल

कृती : दोडक्याची भाजी करताना राहिलेल्या शिरा बाजूला काढून घ्या.
आता एका कढईत सुके किसलेलं खोबर, मिरच्या आणि लसूण भाजून घ्या.
आता मिक्सरमध्ये भाजलेले खोबरे, लसूण आणि मिरची वाटून घ्या.
आता कढईत तेल गरम करा. यामध्ये जिरे टाका.
जिरे तडतडले की त्यात तीळ टाकून घ्या.
आता त्यात मिक्सरमध्ये काढलेले वाटण घाला.
परतल्यावर त्यात दोडक्याच्या शिरा आणि शेंगदाणा कूट घाला.
शेवटी मीठ घालून चटणी परतून घ्या.
तुमची दोडक्याच्या शिरांची चटणी तयार आहे.

# काल आणि आजची छायाचित्रकारिता एक खडतर प्रवास



क्षण म्हणजे किती क्षणिक असतो! एकदा डोळ्यासमोरून निघून गेला की तो पुन्हा परत येत नाही. पण छायाचित्रकाराच्या कॅमेऱ्यात मात्र तो क्षण कायमचा जिवंत राहतो. छायाचित्र हे केवळ एक प्रतिमा नसते, तर त्या क्षणाचे धडधडणारे हृदय असते.

'फोटो' म्हणजे प्रकाश आणि 'ग्राफी' म्हणजे रंग. म्हणजेच प्रकाशाचे रंग घेऊन तयार होणारी जादू म्हणजे छायाचित्रकारिता. सोळाव्या शतकापासून शास्त्रज्ञ या क्षेत्रात संशोधन करत आले. 1826 मध्ये जोसेफ नाईसफॉर निप्से यांनी फ्रान्समध्ये खिडकीतून टिपलेले पहिले छायाचित्र हा त्या प्रवासाचा पाया ठरला. 19 ऑगस्ट 1839 रोजी फ्रान्स प्रशासनाने हा शोध जाहीर केला आणि त्याच दिवसापासून जगभरात हा दिवस जागतिक छायाचित्र दिन म्हणून साजरा केला जातो.

पूर्वी छायाचित्रणाचा प्रवास खडतर होता. 35 मिमी फिल्म रोलमधील केवळ 24 किंवा 36 फ्रेम्समध्येच छायाचित्रकाराला आपली कला दाखवावी लागायची. प्रत्येक फोटो हा महत्त्वाचा असायचा कारण एकदा क्लिक झाला की परत बदलता येत नसे. डार्करूममधील रसायनांचा वास, लालसर प्रकाश, तासन्तास चालणारी मेहनत — या सगळ्यांतून एक छायाचित्र जन्म घ्यायचे. त्या काळात छायाचित्र फक्त कागदावर छापलेली प्रतिमा नव्हती; ती होती छायाचित्रकाराच्या संयमाची, मेहनतीची आणि कलात्मक दृष्टीची कहाणी.

आज तंत्रज्ञानाच्या क्रांतीने छायाचित्रण अधिक सोपं आणि सुलभ झालं आहे. डिजिटल कॅमेरे, मोबाईल फोन यामुळे "ज्याच्या हातात मोबाईल तो छायाचित्रकार" असं समीकरण झालं आहे. परंतु खरं छायाचित्रण केवळ बटण दाबण्यात नाही, तर प्रकाश समजून घेण्यात आहे. प्रकाशाचा कोन, रंगांची सांगड, रचनेचा विचार — हे सगळं कॅमेराच्या लेन्समध्ये पकडताना हृदयाची आणि डोळ्यांची दृष्टी तितकीच महत्त्वाची असते.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) देखील छायाचित्रणाच्या जगात प्रवेशली आहे. AI तंत्रज्ञानामुळे हवे तसे फोटो काही क्षणात तयार होतात. त्यामुळे छायाचित्रकारांची गरज कमी होईल का असा प्रश्न निर्माण होतो. पण खरी गोष्ट अशी की कॅमेरा असो वा AI, छायाचित्राला आत्मा मिळतो तो छायाचित्रकाराच्या भावनांतूनच. यंत्र माणसाच्या भावनांना पर्याय ठरू शकत नाही. म्हणूनच छायाचित्रकाराने AI ला धोका न मानता ते नवं शस्त्र म्हणून स्वीकारलं पाहिजे.

छायाचित्रकारितेचे टप्पे अनेक आहेत — प्रतिमा पाहण्याची दृष्टी, कॅमेरा हाताळण्याचे तंत्र, छायाचित्राची प्रक्रिया आणि सगळयात महत्त्वाचं म्हणजे स्वतःचा कलात्मक दृष्टिकोन. प्रत्येक छायाचित्रकाराची संकल्पना वेगळी असते आणि त्याच्या छायाचित्रांतून त्याचा आत्मा दिसतो. त्यामुळे या कलेत कोणतेही आखीव-रेखीव नियम नसतात; इथे फक्त मनापासून केलेली सर्जनशीलता चालते. छायाचित्रकाराच्या हातात कॅमेरा असावा, पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे त्याच्या डोळ्यातही एक कॅमेरा असावा. कारण जेव्हा डोळ्यांतून भावना उमटतात, तेव्हा टिपलेली प्रतिमा केवळ छायाचित्र न राहता जिवंत आठवण बनते.

आज या जागतिक छायाचित्र दिनी आपण त्या प्रत्येक छायाचित्रकाराला सलाम करूया ज्यांनी आपल्या कॅमेऱ्यातून काळ थांबवला, भावनांना आवाज दिला, आणि आपल्याला क्षण पुन्हा पुन्हा जगण्याची संधी दिली. छायाचित्रकारिता ही केवळ कला नाही, तर आयुष्याच्या प्रवासाची भावनिक कहाणी आहे.





प्रफुल्ल गांगुर्डे
(ज्येष्ठ छायाचित्रकार)

# केडीएमसी राबविणार 'मिशन शक्ती'
## 'कर्करोग मुक्त अभियान' कार्यक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आरोग्य विषयक विविध कार्यक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणजे असंसर्गजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम, या कार्यक्रमाला बळकटीकरण देण्यासाठी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून "मिशन शक्ती: कर्करोग मुक्त अभियान" हा एक अतिशय महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका व टाटा मेमोरियल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने एक अनोखा कर्करोग तपासणी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत तोंडाचा, स्तनाचा आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग यांचे लवकर निदान, पुढील तपासणी व उपचार यावर विशेष भर दिला जाणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत महानगरपालिकेच्या आशा सेविकांमार्फत कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात घरोघरी सर्वेक्षण करण्यात येणार असून त्यातून संशयित लक्षणे असणाऱ्या महिलांची 'टाटा मेमोरियल सेंटरचे तज्ञ डॉक्टर' आणि 'नागरी आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी' यांच्या टिम मार्फत तपासणी करण्यात येणार आहे. या तपासण्या केल्यानंतर गरजेनुसार महिलांना पुढील उपचाराची सोय टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे करुन दिली जाणार आहे. दि. 15 ऑगस्ट रोजी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते मिशन शक्ती-कर्करोग मुक्त अभियानाच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. महिलांमध्ये कर्करोगाविषयी जन जागरुकता निर्माण करणे आणि वेळेत निदान होण्यासाठी त्यांना प्रेरित करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि टाटा हॉस्पिटल यांच्या संयुक्त सहकार्याने होणारी ही मोहिम महिलांच्या आरोग्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तरी, सर्वेक्षणादरम्यान सर्व महिलांनी आशा सेविकांना आरोग्यविषयक माहिती देऊन, स्वतःला काही लक्षणे जाणवत असल्यास त्वरीत आपल्या नजीकच्या आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

### ब्रह्मांड कट्टयावर अजेय संस्था प्रस्तुत
# मराठी भाषेचा साहित्यिक जागर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



ब्रह्मांड कट्टया सामाजिक-सांस्कृतिक मंडळ व सांज स्नेह जेष्ठ नागरिक संघ यांच्या सौजन्याने दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी अजेय संस्था प्रस्तुत मराठी भाषेतील साहित्याचा दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अजेय संस्था ही सन २००९ पासून साहित्य चळवळ,सादरीकरण पद्धती,मराठी भाषेचा प्रसार, असे मराठी साहित्याला धरून सृजनात्मक कार्यक्रम सादर करते.

आपली मराठी भाषेतील साहित्य, लेखन,वाचन व काव्य या कलांसोबत दर्जेदार कार्यक्रम सादर करते. "शतकोटी" हा सलग १७ तास अभिवाचनाचा कार्यक्रम या संस्थेने केला. या संस्थेचे निर्माते गौरव संभूस असून संकल्पना व दिग्दर्शन डॉ. क्षितिज कुलकर्णी यांचे आहे.

शिक्षण मंत्री यांची मुलाखत अवधूत यरगोळे व समीर शिर्के यांनी सादर केली.अभिजात मराठी कवितेचे दृकश्राव्य माध्यमातून "दशपदी" हा विश्वविक्रमी प्रयोग डॉ. क्षितिज कुलकर्णी व प्रसन्न माळी यांनी सादर केला दशपदी म्हणजे १० ओळींची कविता. नारायण सुर्वे , बा. सी .मर्ढेकर ,विंदा करंदीकर, यांच्या कविता सादर करण्यात आल्या . तसेच डॉ. क्षितिज कुलकर्णी यांच्या निवडक कविता प्रसन्न माळी यांनी सादर केल्या.

लेखक पु.ल.देशपांडे यांचे वाऱ्यावरची वरात याचे विनोदी सादरीकरण गौरव संभूस व अवधूत कुलकर्णी यांनी सादर केले. या कार्यक्रमास रसिक प्रेक्षकांनी मनसोक्त हसून दाद दिली.

त्यानंतर सादर झाल्या हास्य काव्य शृंखला..अभिजात विनोदी कवितांचे सादरीकरण मुग्धा फाटक यांनी कारकून, नेहा हजारे यांनी सफरचंद अंकिता आचार्य यांनी गणेश कृपा, मयुरेश लोखंडे यांनी लव लेटर व किरण बर्डे यांनी आचार्य अत्रे यांची मंत्री ही कविता सादर केली.

अशा या विविध मराठी भाषा साहित्याने नटलेल्या कार्यक्रमास उपस्थित प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच सौ.सुहासिनी भालेराव यांनी श्रावण महिन्यांचे उस्फूर्त वर्णन करून महत्त्व सांगितले. तसेच ब्रह्मांड परिसरातील जागरूक नागरिक अशोक जोशी व त्यांचे सहकारी यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व विशद करून त्याच्या तर्फे चालविण्यात येत असलेल्या उपक्रमाबद्दल माहिती सांगितली. या स्तुत्य उपक्रमाबद्दल ब्रह्मांड कट्टयावर त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ब्रह्मांड कट्टयावर अजेय या संस्थेने मराठी भाषेतील विश्वविक्रमी कार्यक्रम सादर केल्याबद्दल ब्रह्मांड परिसरातील "मायबोली" या साहित्यप्रेमी मंडळातर्फे अजेय या संस्थेचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मायबोली मंडळाच्या छाया धोपेश्वरकर , स्वाती चव्हाण, शहाणे मॅडम,वैशाली जोशी,वर्षा गंद्रे उपस्थित होत्या.

ब्रह्मांड कट्टयाचे संस्थापक श्री.राजेश जाधव याच्या हस्ते अजेय संस्थेच्या कलाकारांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्ष महेश जोशी यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### मुंबई गोवा महामार्गावर
# सीसीटीव्ही कॅमेरांचे लोकार्पण व पुरस्कार वितरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : मुंबई गोवा महामार्ग व रायगड जिल्ह्यात होणारी गुन्हेगारी रोखण्यासाठी तसेच गुन्ह्यात वापरलेल्या वाहनांची इत्यंभूत माहिती मिळण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावरील साई सहारा रेस्टॉरंट समोर ANPR या अत्याधुनिक पद्धतीचे कॅमेरे बसविले असून त्याचे उदघाटन आज प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, प्रांताधिकारी प्रवीण पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, तहसीलदार तानाजी शेजाळ, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, दादर पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राम्हणे, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे साई सहारा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष कल्पेश शरद ठाकूर यांच्या हस्ते झाले.

सदर सीसीटीव्ही कॅमेरांचे लोकार्पण होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रातील हेल्प फाऊंडेशन खोपोली,अहिल्या सामाजिक संस्था पेण, वाईल्डर कोलाड, संपर्क बालग्राम पोयनाड, व सिस्केप संस्था महाड या संस्थेतील पदाधिकाऱ्यांचा येथे सत्कार करण्यात आला.

यावेळी मुंबई गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांचे मदतगार देवदूत कल्पेश ठाकूर हे दिवस असो वा रात्र असो नेहमीच अपघातग्रस्तांना स्वतःच्या रुग्णवाहिकेतून मदत करत असतात तसेच आपत्कालीन परिस्थिती सुद्धा लोकसेवा करत असतात. आता गुन्ह्यात वापरलेल्या वाहनांची इत्यंभूत माहिती पोलिसांना मिळण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावरील साई सहारा रेस्टॉरंट समोर ANPR या अत्याधुनिक पद्धतीचे कॅमेरे बसविण्याचा नवीन उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे. असे उदगार प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांनी येथे सांगितले.सामाजिक कार्य करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही मात्र कल्पेश केवळ सामाजिक कार्याच नाही तर जीवन वाचवण्याचे महान कार्य करीत असल्याबद्दल त्याचे आभार मानावे तेव्हढे कमीच पडतील असे उदगार विभागीय पोलीस अधिकारी अधिकारी जालिंदर नालकुल यांनी सांगितले.

एएनपीआर केमेरे मूळे अवैध वाहतूक व गुन्हेगारी करून पळून जाणाऱ्या वाहनावर आता नजर राहणार आहे. असे पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांनी यावेळी सांगितले. पोलिसांसाठी मदत करणारा कल्पेश ठाकूर खरंच पोलिसदूत आहे. अन्याय करणाऱ्या लोकांना न्याय मिळण्यासाठी जो पोलिसांना मदत करतो त्याचे आभार मानायलाच पाहिजे असे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी येथे संगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.किरण कारंदीकर, गणेश थवई, व आभार दिक्षा पेरवी यांनी मानले.या कार्यक्रम प्रसंगी अनेक सामाजिक कार्यकर्ते,साई सहारा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# आमगाव आश्रमशाळा येथे रानभाजी महोत्सव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



वाडा : विद्यार्थ्यांना, नव्या पिढीला रानभाज्यांची ओळख व्हावी, त्यांचे फायदे, खरेदी - विक्री कळावी ह्या उद्देशातून आश्रमशाळा आमगाव येथे रानभाज्या महोत्सव भरवण्यात आला. त्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विविध प्रकारच्या रानभाज्या प्रदर्शनात होत्या. त्यामध्ये हिरवा व लाल माट (राजगिरा), काटे माट, माटाचे देठ, कोवळया बांबूची भाजी, कंटोले (करटोली), अंबाडी, नाल (नाळभाजी), टाकळा, खुरासन, चंदनबटवा, टेटवी, अळू ची भाजी इत्यादी भाज्यांचा समावेश होता. त्यामध्ये Vitamin A, खनिजे, फायबर, लोह, कॅल्शिअम, Vitamin C, हे घटक या भाज्यांमधून मिळतात हि माहिती विद्यार्थ्यांनी दिली. तसेच प्रदर्शन झाल्या नंतर बाजार खरेदी-विक्री ची माहितीही विदयार्थांना दिली. नव्या पिढीसाठी हा महोत्सव फायद्याचा ठरला.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक खरूळे सर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.

# पडघ्यात श्रीकृष्णजयंतीनिमित्त मिरवणुक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे सजविलेल्या रथातुन पारंपारिक पद्धतीने श्रीकृष्ण - पेंद्यांची मिरवणुक काढण्यात आली होती.

गोकुळाष्टमी निमीत्त पडघा ग्रामस्थ मंडळाच्या वतीने लहान मुलाची वेशभूषा केलेल्या श्रीकृष्ण व त्यांचा लहानपणीचा सहकारी पेंद्यांची सजविलेल्या रथातुन पारंपारिक पध्दतीने वाजत गाजत संपूर्ण पडघे गावातुन मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीला गेल्या अनेक वर्षांची परंपरा असुन यावर्षीही ही परंपरा जोपासण्यात आली पुर्वी ही मिरवणुक सजविलेल्या बैलगाडीतून निघत असे परंतु बैलगाडी कालबाह्य झाल्याने ही मिरवणूक रथातुन काढण्यात आली यावेळी नागरीकांनी घरासमोर रथात विराजमान झालेल्या श्रीकृष्णाची मनोभावे आरती केली. यावेळी मिरवणूकीत नागरीक सहभागी झाले होते. तसेच मिरवणुक पुर्ण झाल्यानंतरच गावात बांधलेल्या दहीहंडी फोडण्याची परंपरा आहे.

**या मिरवणुकीला गेल्या अनेक वर्षांची परंपरा असुन यावर्षीही ही परंपरा जोपासण्यात आली पुर्वी ही मिरवणुक सजविलेल्या बैलगाडीतून निघत असे परंतु बैलगाडी कालबाह्य झाल्याने ही मिरवणूक रथातुन काढण्यात आली**



## आजचे राशि भविष्य

**मेष**
घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. तुमच्या आजूबाजूचे लोक तुमच्या मेहनतीने प्रभावित होतील आणि तुमचे अनुसरण करतील.

**वृषभ**
व्यवसायात नेहमीपेक्षा चांगला फायदा होईल. आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल विद्यार्थ्यांसाठी दिवस समाधानकारक असेल, त्यांना नवीन शिकायला मिळेल.

**मिथुन**
तुम्हाला एखाद्या वयोवृद्ध व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळेल, हे भाग्य समजा. आज तुम्ही सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यास तयार असाल.

**कर्क**
विचारपूर्वक केलेल्या कृतीतून तुम्हाला फायदा होऊ शकतो. प्रयत्न केल्यास यश मिळू शकते.राजकारणाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे.

**सिंह**
समाजहितासाठी केलेल्या कामाचे कौतुक होऊ शकते. नोकरीत नवीन यश मिळण्याची शक्यता आहे. घरगुती जीवनावश्यक वस्तू खरेदी कराल.

**कन्या**
तुमचे व्यवहारही जलद होऊ शकतात.तुम्हाला एखादी मोठी जबाबदारी मिळू शकते जी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**तूळ**
तुम्ही जे काही काम करण्याचा प्रयत्न कराल, त्या कामात तुम्हाला यश मिळेल. तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल, यामुळे तुमचे मनोबल वाढेल.

**वृश्चिक**
तुम्ही आव्हानांचा सामना कराल, तुम्ही त्यांचा धैर्याने सामना कराल आणि तुम्हाला यश मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस सामान्य असेल.

**धनु**
करिअरशी संबंधित निवड तुम्हाला काही अडचणीत टाकू शकते परंतु योग्य बिंदू निवडणे चांगले होईल. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**मकर**
कोणतेही काम करताना घाई करू नका.कामाबाबत काही नवीन कल्पना मिळू शकतात. तुम्ही त्यांच्यावर लवकरच काम सुरू करू शकता.

**कुंभ**
करिअरमधील चढ-उतारांमुळे तुम्ही त्रस्त असाल, परंतु काही अनुभवी वरिष्ठांच्या मदतीने तुम्हाला आराम मिळेल. घरात मुलांसोबत चांगला वेळ घालवाल.

**मीन**
नोकरी करणाऱ्या लोकांना बढतीची संधी मिळेल. ऑफिसमध्ये चांगल्या कामगिरीसाठी तुमचा सन्मान होऊ शकतो.. आयुष्यातील सर्व समस्या दूर होतील.












# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर केडीएमसी सतर्क

## इंटिग्रेटेड कमांड सेंटर मधून आयुक्तांनी घेतला आढावा!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गेल्या दोन दिवसापासून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रात होणाऱ्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त यांनी महापालिका मुख्यालयातील IIIC(इंटिग्रेटेड कमांड आणि कंट्रोल सेंटर ) मधून अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या एकंदर परिस्थितीचा आढावा घेतला आणि त्या संदर्भात सर्व अधिकारी वर्गास योग्य त्या सूचना दिल्या .यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी, आपत्कालीन नियंत्रण विभागाचे उपायुक्त संजय जाधव ,उपायुक्त समीर भुमकर तसेच इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता.

आज सकाळी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रात जवळ-जवळ 74 मिमी पाऊस पडलेला आहे. सद्या परिस्थिती नियंत्रणात आहे. महापालिकेच्या



**आपत्कालीन परिस्थितीच्या वेळी महापालिकेचा टोल फ्री क्रमांक**
**१८००२३३४३९२**
**१८००२३३००४५**

कंट्रोल रूम मध्ये तसेच प्रभाग स्तरावरही महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी कार्यान्वित आहेत. प्रत्येक ठिकाणी जेथे वॉटर लॉगिंग होत आहे तेथे पाणी साचू नये याकरीता कार्यवाही सुरु आहे. काही ठिकाणी पाणी साचलेले आहे तेथे नागरीकांसाठी उपयुक्त खबरदारी घेतली जाते तसेच पूर परिस्थितीतील नागरीकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतरण करून त्यांना फुड पॅकेट्स इ. व्यवस्था महापालिकेमार्फत करण्यात आलेली आहे अशी माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी दिली तसेच हवामान खात्याने दोन दिवस रेड अलर्ट सांगितल्यामुळे नागरीकांनी खुप आवश्यक काम नसेल, तर घरातून बाहेर पडू नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले .

## उपनगरीय रेल्वे सेवा विस्कळीत...

# पावसात अडकलेल्या चाकरमान्यांच्या मदतीला धावून आली टीएमटी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : मागील दोन दिवसापासून सुरु असलेल्या पावसामुळे मध्य रेल्वेची सेवा विस्कळीत झाली असून ठाणे-सीएसएमटी रेल्वे सेवा तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याचा निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी ठाणे महापालिकेच्या परिवहन विभागाकडून ४० ज्यादा बसगाड्या ठाणे सॅटीस पुलाहून मुलुंडपर्यंत सोडण्यात येत आहेत.



गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका मध्य रेल्वे मार्गावर बसला आहे. या मुसळधार पावसामुळे मुंबई उपनगरात ठिकठिकाणी रुळांवर पाणी साचल्याने रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यामुळे ठाणे ते सीएसएमटी या महत्त्वाच्या मार्गावरील रेल्वे सेवा तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला. या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे ठाणे, मुलुंड, भांडुप, विक्रोळी, घाटकोपर, कुर्ला तसेच मुंबईच्या इतर महत्त्वाच्या स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी उसळली होती.

मुसळधार पावसामुळे शासकीय कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. परंतु, अनेक खासगी कंपन्यांची कार्यालये सुरु आहेत. कामानिमित्ताने मुंबईच्या दिशेने निघालेल्या नोकरदाराला त्याचा परिणाम सहन करावा लागला. ठाणे- सीएसएमटी रेल्वे सेवा तात्पुरती बंद झाल्याने अनेक नोकरदार ठाणे रेल्वे स्थानकात अडकून होते. दरम्यान, या प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी ठाणे महापालिकेच्या परिवहन विभागाकडून ज्यादा बस गाड्यांचे नियोज आखण्यात आले आहे. ठाणे सॅटीस ते मुलुंड या मार्गावर टीएमटीच्या ४० गाड्या सोडल्या आहेत. या मार्गावर सकाळी १० वाजल्यापासून बस गाड्यांच्या फेऱ्या सुरु आहेत.

मुलुंडहून या प्रवाशांना इच्छित स्थळी जाण्यासाठी बेस्टच्या गाड्या उपलब्ध आहेत. त्यामुळे टीएमटी गाड्या मुलुंडपर्यंत सोडण्यात येत असल्याची माहिती ठाणे महापालिका परिवहन विभागाचे वाहतूक व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे यांनी दिली.

# उरणच्या न्हावा शेवा पोलीस ठाण्यात पाणीच पाणी

### नाल्यांचे नैसर्गिक प्रवाह बंद केल्याने पोलिसांवर तुंबलेल्या पाण्यात काम करण्याची वेळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : मंगळवारी उरणमध्ये सुरू असलेल्या संततधारे मुळे न्हावा शेवा पोलीस ठाण्यात पाणी साचले होते. जेएनपीए बंदर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात येथील नैसर्गिक नाले बुजवून रेल्वे आणि रस्ते मार्ग उभारण्याचे काम करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे न्हावा शेवा पोलीस ठाणे हे रस्त्याच्या उंची पेक्षा कमी पातळीवर आहे. त्यामुळे दरवर्षी या पोलीस ठाण्यात पाणी शिरत आहे. गेल्या दोन दिवसांपासून उरण परिसरात मुसळधार पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे पाण्याचा निचरा होण्यास उशीर लागत आहे. अगदी समुद्र किनाऱ्यावर असलेल्या न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या इमारतीत पावसाचे व समुद्राच्या भरतीचे पाणी ही शिरू लागले आहे. मंगळवारी दुपारी समुद्राच्या भरतीची वेळ होती. त्यामुळे पावसाचे आणि समुद्राच्या भरतीचे पाणी यांचा मेळ झाल्याने हे पाणी न्हावा शेवा पोलीस ठाण्यात शिरला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# वसई : पुरात अडकलेल्या तीस नागरिकांची सुटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई** : वसई विरार शहरात मुसळधार सुरू असलेल्या पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. या पुराच्या पाण्यात वसई भोयदापाडा राजावळी येथील बैठ्या चाळीत अडकून पडलेल्या ३० नागरिकांची अग्निशमन दलाकडून सुखरूप सुटका करण्यात आली आहे. मागील चार दिवसांपासून शहरात पावसाने थैमान घातले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्याने संपुर्ण शहर जलमय होऊन गेले आहे. याचा फटका वसई पूर्वेच्या भागात असलेल्या बैठ्या चाळींना सुद्धा बसला आहे. अनेक ठिकाणच्या बैठ्या चाळीत पाणी शिरले आहे. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली आहे.

# वसई- भाईंदर रो-रो सेवा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता : वसई: वसई भाईंदर दरम्यान प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी रो रो सेवा चालवली जाते. पण, शहरात कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे रो रो सेवाही आता बंद करण्यात आली आहे. वसई-भाईंदर या भागातील नागरिकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र सागरी मंडळातर्फे वसई- भाईंदर दरम्यान रोरो सेवा सुरू करण्यात आली आहे. सुवर्णदुर्ग शिपींग व मरीन सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्या मार्फत ही चालविली जाते. वसई ते भाईंदर मार्गदरम्यान एकूण अवंतिका, सोनिया आणि वैभवी अशा ३ बोटी चालवल्या जातात.



# मुंबई - ठाण्यातील अतिवृष्टीचा उपउपमुख्यमंत्र्यांकडून आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयुक्त सौरभ राव व महापालिका अधिकाऱ्यांसमवेत शहरातील निरनिराळ्या भागात भेट देऊन पाहणी केली. ठाण्यातील कोपरी परिसरातील चिखलवाडी येथे नागरी वस्तीमध्ये पाणी साचले होते. या ठिकाणी भेट देऊन इथे तातडीने सक्शन पंप लावून पाण्याचा निचरा करण्याचे निर्देश दिले. विक्रोळी येथे काही दिवसांपूर्वी दरड कोसळून दुर्घटना घडली होती, आज तिथेही भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. कुर्ला येथील क्रांती नगर, हनुमान नगर येथे मिठी नदीने धोक्याची पातळी ओलांडली होती.

याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिका आयुक्तांशी फोनवरून चर्चा केली आणि मिठी नदीच्या परिसरात एनडीआरएफची पथके आणि लाइफ जॅकेट सहित बोटी तैनात ठेवण्याचे निर्देश दिले. यावेळी आमदार दिलीप लांडे, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पूर्व उपनगरे अमित सैनी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव उपस्थित होते.

# मुसळधार पावसामुळे निळजे बोगद्यात पाच फूट पाणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली - डोंबिवली जवळील शीळफाटा रस्त्यावरील निळजे गाव ते पलाव वसाहतीत जाण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने निळजे ग्रामस्थांशी चर्चा न करता परस्पर ग्रामस्थांच्या सोयासाठी रस्ते मार्गासाठी बोगदा बांधून दिला. मुसळधार पावसामुळे या बोगद्यात पाच फूट पाणी साचल्याने निळजे ग्रामस्थांचा पलावा वसाहतीत जाण्याचा मार्ग मंगळवारी सकाळपासून बंद झाला आहे.

निळजे रेल्वे बोगद्यातून निळजे



ग्रामस्थ किंवा पलावा परिसरातील नागरिक या बोगद्यातून येतात. यापूर्वी थोडा पाऊस पडला तरी या बोगद्यात गुडघाभर पाणी साचते. रात्रभर मुसळधार पाऊस कोसळत असल्याने बोगदा आणि त्याचा परिसर जलमय झाला आहे. याठिकाणाहून नैसर्गिक पाण्याचा प्रवाह आहे. पावसाचे पाणी याच भागातून वाहून जाते, अशी माहिती निळजेचे ग्रामस्थ प्रकाश पाटील आणि सहकाऱ्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना दिली होती. त्याऐवजी बंद केलेल्या रेल्वे फाटकाखालून भुयारी मार्ग बांधून देण्याची मागणी केली होती. सुरूवातीला या मागणी विषयी रेल्वे अधिकारी सकारात्मक होते. पण नंतर त्यांची भूमिका बदलली.

# अतिवृष्टी तसेच आपत्तीचा सामना करण्यास ठाणे मनपा प्रशासन सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे 19** : गेल्या दोन दिवसापासून ठाणे शहरात पावसाची संततधार सुरू असून हवामानखात्याने ठाण्यासाठी रेड अलर्ट दिला आहे. अतिवृष्टीदरम्यान नागरिकांची गैरसोय होवू नये यासाठी शहरातील पाणी साचण्याची जी ठिकाणे आहेत त्या ठिकाणी पाण्याचा निचरा लवकर होईल या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिका प्रशासनाला दिल्या. सोमवारपासून ठाणे शहरात मुसळधार पाऊस सुरू असून या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयुक्त सौरभ राव व महापालिका अधिकाऱ्यांसमवेत चिखलवाडी, भांजेवाडी या परिसराची पाहणी करुन या ठिकाणी साचलेले पाणी बाहेर काढण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच आवश्यकता भासल्यास नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याच्या सूचना दिल्या.

या पाहणी दरम्यान आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, मनीष जोशी, शंकर पाटोळे आदी उपस्थित होते.

दिनांक 17 ऑगस्ट रोजी ठाणे शहरात 223.43 मि.मी इतका पाऊस झाला. तर मंगळवार सकाळपासून दुपारी 1.30 वाजेपर्यत एकूण 67.55मि.मी पावसाची नोंद झाली आहे. सतत पडत असलेल्या पावसामुळे ठाणे महापालिकेची यंत्रणा ही 24 तास काम करत असून आपत्कालीन कक्षाच्या माध्यमातून परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

ज्या ज्याठिकाणी सखल भागात पाणी साचत आहेत, त्या ठिकाणी पंप लावून पाण्याचा निचरा केला जात आहे. तसेच अतिरिक्त मनुष्यबळ देखील पुरविण्यात आले आहे. संध्याकाळी मोठी भरती असून या काळात देखील मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेवून विशेष यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. अतिवृष्टीच्या काळात नागरिकांना स्थलांतर करण्याची वेळ आल्यास त्यासाठी महापालिकेच्या वास्तू तसेच शाळा याठिकाणी सोय उपलब्ध करण्यात आली असल्याचेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

ठाणे शहरातील पातलीपाडा येथील श्री माँ शाळेची संरक्षण भिंत तसेच मुंब्रा येथील नाशिक वॉर्ड चाळीतील घराची भिंत व ओझोन व्हॅली येथील नाल्याची संरक्षण भिंत नाल्यामध्ये पडल्याच्या घटना घडल्या असून कोणतीही जीवीतहानी झालेली नाही. त्याचप्रमाणे लोकमान्य पाडा क्र. 4 येथे डोंगरावरची माती खाली आल्याने एका व्यक्तीस दुखापत झाली असून त्याला उपचारार्थ छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे पाठविण्यात आले असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले.



## आयुक्तांनी घेतला आपत्कालीन कक्षाचा आढावा

ठाणे महापालिकेच्या आपत्कालीन कक्षात आयुक्त सौरभ राव यांनी भेट देवून आढावा घेतला. आपत्कालीन कक्षात मदतीचा कॉल आल्यास तात्काळ त्या ठिकाणी मदत पोहचेल या दृष्टीने संबंधित विभागाला माहिती द्यावी अशा सूचनाही आयुक्तांनी दिल्या. महापालिका क्षेत्रात आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी घाबरुन न जाता महापालिकेच्या आपत्कालीन कक्ष वा स्थानिक प्रभाग समितीशी संपर्क साधवा तसेच महापालिकेने वेळोवळी दिलेल्या सूचनांची पालन करावे असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

# गणेशोत्सवाच्या सर्व परवान्यांसाठी केडीएमसीत ऑनलाईन प्रणालीचा श्रीगणेशा !




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : यावर्षी पर्यावरणपूरक व नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केले ,कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजिलेल्या बैठकीत बोलताना आयुक्त अभिनव गोयल यांनी हे प्रतिपादन केले. या बैठकीत आयुक्त अभिनव गोयल यांनी गणेशोत्सव पर्यावरणपूरक व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी महत्त्वाचे मुद्द्यांवर चर्चा केली. त्याचप्रमाणे याच वर्षी प्रथमतः श्री गणेशोत्सवाच्या परवानग्या म्हणजे महापालिका, पोलीस, महावितरण यांचेकडील परवानग्या ऑनलाइन पद्धतीने प्राप्त होतील अशीही माहिती उपस्थितांना दिली, यामुळे श्रीगणेशोत्सव मंडळांना यावर्षी परवानगीसाठी विविध कार्यालयात जाण्याची आवश्यकता राहणार नाही. तरीही एखाद्या मंडळास ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यास अडचण येत असेल तर प्रभाग स्तरावर महापालिकेने एक खिडकी योजनेची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे तेथील कर्मचारी वर्गाचे सहकार्य अर्ज करण्यासाठी मिळू शकेल अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. महापालिका उपायुक्त समीर भूमकर यांनी ऑनलाईन पद्धतीने सर्व परवानगींसाठी अर्ज कसे करावे याबाबतचे मार्गदर्शन उपस्थित श्री गणेश मंडळांच्या प्रतिनिधींना केले.

गणेशोत्सवाच्या काळात मंडळे व नागरिकांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन महापालिकेने रस्त्यांच्या दुरुस्तीबाबतच्या तक्रारी संकलित केल्या असून विसर्जन घाट आणि मिरवणुकीचे मार्ग या ठिकाणाच्या रस्त्यांची दुरुस्ती लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल तसेच जे रस्ते इतर प्राधिकरणाचे आहेत त्यांनाही याबाबत सूचना देण्यात असल्याचे आयुक्त अभिनव गोयल यांनी या बैठकीत सांगितले. नागरिकांनी, श्री गणेश मंडळांनी शक्यतो शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करावा, ६ फूटापेक्षा लहान मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावाचा उपयोग करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावर्षीच्या गणेशोत्सवातील मिरवणुका पारंपरिक, शिस्तबद्ध व मर्यादित ध्वनीच्या माध्यमातून आयोजित कराव्यात, यावर्षीचा श्री गणेशोत्सव डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करूया असे आवाहन परिमंडळ- 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी यावेळी केले. या बैठकीस ठाण्याचे अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव, परिमंडळ 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, इतर पोलीस अधिकारी /कर्मचारी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, इतर अधिकारी वर्ग ,प्रांत अधिकारी विश्वास गुजर,तहसीलदार सचिन शेजाळ ,उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी वर्ग तसेच कल्याण डोंबिवलीतील श्री गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.




# धर्मवीर विचार मंचाचे वाडा कार्यालयासमोर आमरण उपोषण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : धर्मवीर विचार मंचच्या वतीने वाडा तहसील कार्यालयासमोर आजपासून आमरण उपोषण सुरु केले आहे. वाडा तालुक्यातील विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी करता ऑफलाईन पद्धतीने वाडा तालुक्यातील विद्यालयातच प्रवेश मिळावा, अती उच्च दाब क्षमतेच्या विद्युत वाहिनी प्रकल्प खावडा IV C मध्ये बाधित जमीन क्षेत्राचा योग्य मोबदला दिला जात नाही तोपर्यंत सदरचे काम बंद ठेवावे, चिंचघर - बुधावली - देवघर रस्त्याची दुरावस्था पाहता तात्काळ रस्त्याची सुधारणा, डागडुजी करून रस्ता सुस्थितीत येईपर्यंत रस्त्यावरील अवजड वाहतूक तात्काळ बंद करावी, मौजे डोंगस्ते ते विजयगड येथील मे. श्रीजी स्टोन क्रशर कंपनीस 24 तास उत्खनन व वाहतुकीकरता परवानगी नसतानाही कंपनीकडून 24 तास सुरु असलेली वाहतूक व उत्खनन तात्काळ बंद करून संबंधितांवर कारवाई करावी, इत्यादी मागण्या घेऊन हे उपोषण सुरु असल्याचे मंचाच्या वतीने सांगण्यात आले.



# केडीएमसीच्या ४९० पदांच्या भरतीसाठी सप्टेंबरमध्ये लेखी परिक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये ४९० रिक्त पदांसाठी भरती करत आहे. केडीएमसी प्रशासनाला आतापर्यंत ५० हजारांहून अधिक ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत. रिक्त पदांच्या भरतीसाठी टीसीएसकडून ९ ते १२ सप्टेंबर दरम्यान ही परीक्षा घेण्याचा प्रस्ताव आहे. या परीक्षेचे वेळापत्रक, परीक्षा केंद्र, प्रवेशपत्र माहिती लवकरच केडीएमसीच्या वेबसाइटवर प्रकाशित केली जाईल.

केडीएमसीमध्ये लोकप्रतिनिधींचे राज्य सत्तेत आल्यानंतर, १५०० रिक्त पदांची मेगा भरती करण्यात आली. जवळजवळ ३० वर्षांनंतर, एकाच वेळी ४९० रिक्त पदांची भरती केली जात आहे. महानगरपालिका प्रशासनाने १००० हून अधिक रिक्त पदे भरण्याचा प्रस्ताव ठेवला होता, परंतु, महानगरपालिका आयुक्तांनी फक्त आवश्यक रिक्त पदे भरण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर, महानगरपालिका प्रशासनाने ४५० पदे कमी करून ४९० पदे भरण्याची जाहिरात प्रसिद्ध केली होती. रिक्त पदांच्या भरतीसाठी जूनमध्ये विविध वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती प्रसिद्ध झाल्या होत्या. परीक्षा शुल्कासह अर्ज करण्याची अंतिम तारीख ३ जुलै निश्चित करण्यात आली होती, परंतु इच्छुक उमेदवारांच्या सोयीसाठी, अर्ज करण्याची मुदत आणखी १५ दिवसांनी वाढविण्यात आली होती.

पोस्टनुसार, केडीएमसी वेबसाइटवर परीक्षेचा अभ्यासक्रम आधीच प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यानुसार, इंग्रजी, मराठी, सामान्य ज्ञान आणि बुद्धिमत्ता चाचण्या घेतल्या जातील. परीक्षेचे वेळापत्रक, प्रवेशपत्र आणि परीक्षा केंद्राची माहिती केडीएमसी वेबसाइटवर प्रसिद्ध केली जाईल. केडीएमसी सामान्य प्रशासन उप आयुक्त वंदना गुळवे यांच्याशी संपर्क साधला असता भरती प्रक्रिया लेखी परिक्षा 9ते12सप्टेंबर दरम्यान पार पडणार असून टीसीएस मार्फत परिक्षा घेतल्या जाणार असल्याचे सांगितले.

# महाराष्ट्रात हायपरलूप प्रकल्पाला गती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र "डेटा सेंटर कॅपिटल" आणि "सौरऊर्जा एकत्रीकरण कॅपिटल" म्हणून पुढे येत आहे. अनेक कंपन्या या क्षेत्रांत येत असून उत्पादन. क्षेत्रातही मोठी क्रांती घडणार आहे. यूकेसोबत झालेल्या रणनीतिक करारामुळे नवे दरवाजे उघडले असून भारतात अधिक गुंतवणूक होत आहे. हे गुंतवणूकदारांचा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील विश्वासाचे द्योतक आहे. आज विविध गुंतवणुकींसाठी महत्त्वपूर्ण असे आठ सामंजस्य करार (MoUs) आणि दोन रणनीतिक करार करण्यात आले असून, त्यातून राज्यात तब्बल 42 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन 28 हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित आज मंत्रालयातील समिती कक्षात 10 सामंजस्य करारांचे आदानप्रदान करण्यात आले. त्यावेळी ते गुंतवणूकदारांसमोर बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेशकुमार, उद्योग सचिव डॉ.पी. अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलारासू, विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह तसेच विविध क्षेत्रातील कंपन्यांचे गुंतवणूकदार उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, गुंतवणूकदारांनी अतिशय ठाम आणि सकारात्मक बांधिलकी दाखवली आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक सुरळीत होण्यासाठी शासनाची संपूर्ण टीम सुरुवातीपासून शेवटपर्यंत तुमच्यासोबत काम करेल. याशिवाय हायपरलूप प्रकल्पालाही गती मिळत आता आयआयटी मुंबई व आयआयटी मद्रास यांच्यामुळे प्रकल्पाला गती मिळत आहे. लॉजिस्टिक, वाहतूक आणि मोबिलिटी क्षेत्रात राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात हा प्रकल्प आमूलाग्र बदल घडवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेले 8 सामंजस्य करार आणि 2 रणनीतिक करार :**

* सोलर पॅनेल निर्मितीसाठी ज्युपिटर इंटरनॅशनल लि. या कंपनीसोबत 10900 कोटी रूपयांची गुंतवणूक करार झाला असून यातून 8308 रोजगार निर्मिती होणार आहे.

* रोचक सिस्टिम्स प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटर करिता 2508 कोटी रूपयांचा करार. 1 हजार रोजगार निर्मिती.

* रोव्हिसन टेक हब प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटर या सेक्टरकरिता 2564 कोटी रूपयांची गुंतवणूक करार. 1100 रोजगार निर्मिती.

* वॉव आयर्न अ‍ॅण्ड स्टिल प्रा.लि. यासाठी पोलाद उद्योगाकरिता 4300 कोटी रूपयांचा करार. 1500 रोजगार निर्मिती.

* वेबमिंट डिजिटल प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटरकरिता 4846 कोटी रूपयांचा गुंतवणूक करार. 2050 रोजगार निर्मिती.

* औद्योगिक उपकरणे क्षेत्राकरिता अ‍ॅटलास्ट कॉपको या कंपनीसोबत 575 कोटी रूपयांचा करार. 3400 रोजगार निर्मिती.

* हरित उर्जा क्षेत्रात एलएनके ग्रीन एनर्जी या कंपनीसोबत 4700 कोटी रूपयांचा गुंतवणूक करार. 2500 रोजगार निर्मिती.

प्रति गाणगापूर
प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



भक्तीमार्गात लोभ विघ्नरूप होतो. माणूस देवासाठी, दान देण्यासाठी, पूजेसाठी कमीत कमी किमंतीच्या वस्तूंचा उपयोग करतो. तो मुलांसाठी कपडे बनविण्यासाठी 70 किंवा 170 रुपये मीटरचे कापड आणतो आणि देवाची वस्त्रे शिवायची असतील तर फक्त 20-30 रुपये मीटरचे कापड शोधतो. एक गृहस्थ फुले आणण्यासाठी बाजारात जातो. माळी म्हणतो, "गुलाबाच्या फुलांची किंमत चार रुपये आहे" तेव्हा तो म्हणतो, "कन्हेरीचीच फुले द्या." पण जेव्हा पत्नी म्हणते की, माझ्यासाठी चांगलीशी वेणी आणा, तेव्हा तो भरपूर किंमत देऊन चांगल्यात चांगली मनपसंत वेणी आणून देतो. सत्यनारायणाची पूजा करण्यास यजमान 200 रुपयांचा पितांबर नसतो व जेव्हा देवाला वस्त्र नेसवण्याचा प्रसंग येतो, तेव्हा तो म्हणतो "मंदार कुठे आहे? तोच आणा". भगवान म्हणतो की, "बेटा मी सर्व जाणतो. मी एक दिवस तुला लंगोटी नेसवीन. मी तुझ्या त्या लंगोटीसाठी दोरी आणून ठेवली आहे." असे करू नये. देव सगळं जाणतो. देवाला उत्तमोत्तम वस्तू भक्तीने द्या.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज
मो.नं.7038727403/9890226862

# मुसळधार पावसात आमदार राजेश मोरे यांनी पहाणी करत नागरिकांना केली मदत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : गेले दोन दिवस मुसळधार पाऊस आणि त्यामुळे विविध ठिकाणी तुंबलेल्या पाण्याचा निचरा व्हावा यासाठी आमदार राजेश मोरे, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, विवेक खामकर, रोहित पाटील व शिवसेना कल्याण ग्रामिण स्थानिक पदाधिकारी यांच्यासह डोंबिवली स्टेशन परिसर, मानपाडा व कल्याण शीळ रोड वरील कल्याण फाटा ह्या ठिकाणी पाहणी करून स्थानिक नागरिक व शिवसेना पदाधिकारी, प्रशासकीय यंत्रणा ह्यांना सोबत घेऊन वाहतूक सुरळीत करण्यासाठी पाण्याचा निचरा लवकर होईल ह्या साठी प्रयत्न केले. अतिवृष्टीमुळे कल्याण-शिळ रस्ता पूर्णपणे पाण्याखाली जाऊन वाहतुकीचा बोजवारा उडाला होता. वाहनधारक व नागरिक प्रचंड अडचणीत सापडले असतानाच कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेतली. मोठ्या प्रमाणात साचलेले पाणी तातडीने बाहेर काढण्यासाठी जेसीबी यंत्रणा लावून जलनिस्सारणाची कामे वेगाने पार पाडली. काही तासांतच वाहतूक सुरळीत करण्यात आली आणि नागरिकांना दिलासा मिळाला. या कामात उपतालुका प्रमुख रोहिदास म्हात्रे, उपजिल्हा प्रमुख राजेश कदम, शाखा प्रमुख बाबुराव पाटील, विवेक खामकर यांच्यासह शिळफाटा-डायघर येथील युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य केले. नागरिकांच्या अडचणींवर तातडीने उपाय शोधणारे, प्रत्येक संकटात लोकांसोबत धावून जाणारे आमदार राजेश मोरे यांचे हे तत्पर नेतृत्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# केडीएमसीकडून रुग्णालय, सोनोग्राफी सेंटर नुतनीकरण प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाईन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत महापालिका क्षेत्रातील सर्व रुग्णालये आणि सोनोग्राफी सेंटर यांची नोंदणी आणि नोंदणी नुतनीकरण नियमितपणे केले जाते. ही रुग्णालये, सोनोग्राफी सेंटर नोंदणी व नुतनीकरन प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि वेळेची बचत करणारी असावी या दृष्टीने ही प्रक्रिया आता पुर्णपणे ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. या मुळे रुग्णालयांना, सोनोग्राफी सेंटर यांना नोंदणी व नुतनीकरणासाठी महापालिका कार्यालयात येण्याची गरज नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत स्वतंत्र ईमेल आयडी रुग्णालये आणि सोनोग्राफी सेंटर यांना उपलब्ध करुन दिला जाणार आहेत. त्यावरुन त्यांना सर्व आवश्यक कागदपत्रे व अर्ज सादर करता येतील. संपूर्ण प्रक्रियेची माहिती व अर्ज सादर करण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे वेळ आणि श्रम यांची बचत होणार असून रुग्णालय नोंदणी व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होईल असा विश्वास कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने व्यक्त केला आहे. तरी सर्व रुग्णालयांनी, सोनोग्राफी सेंटर यांनी वेळेत आपले नूतनीकरण, ऑनलाईन पद्दतीने पूर्ण करावे असे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

# अतिवृष्टीची परिस्थिती लक्षात घेता यंत्रणांनी अधिक अलर्ट रहावे

## - जिल्हाधिकारी किशन जावळे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : भारतीय हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिला असून जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दरडप्रवण अन पूरप्रवण गावांवर जिल्हा प्रशासनाने अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. या गावांना सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन प्रशासनाच्या तयारीचा, उपाययोजनांचा आढावा घेतला. जिल्ह्यातील नदयाची पातळी इशारास्तरापर्यंत आहे. या नद्यांजवळच्या गावातील प्रशासनाने घेतलेली खबरदारी, पर्यायी व्यवस्था, यंत्रणेची सुसज्जता याची माहिती घेतली. या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील पाऊस, संभाव्य अतिवृष्टी, पूरस्थिती आणि दरड कोसळण्याच्या घटना रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, जिल्हा प्रशासन कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार आहे. तहसीलदारांना आवश्यक त्या साधन, सुविधा सज्ज असतील याची खात्री करण्यास सांगितले आहे. आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्याची कार्यवाही तत्काळ करावी. तातडीने मदत व बचाव कार्य यासंबंधी यंत्रणांनी कार्यक्षमतेने काम करावे पाटबंधारे, आरोग्य, महावितरण, बांधकाम विभाग, बंदर विभाग आदी महत्त्वाच्या विभागांना त्यांनी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.

सर्व शासकीय विभागप्रमुखांनी प्रांताधिकारी व तहसीलदार यांच्या सूचनेनुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून "अलर्ट मोड' वर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी जावळे यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्याला देण्यात आलेल्या रेड अलर्ट च्या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांना खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले आहे.

# रोटरी क्लब स्वतःच्या पलीकडे जाऊन समाजाचा विचार करायला शिकवतो

## - डॉ.उदय निरगुडकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



अकोले : रोटरी ही आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारी ग्रेट संघटना आहे. रोटरी नसती तर जगातून पोलिओ हद्दपार झाला नसता, रोटरी नसती तर देशा देशांमध्ये पेटलेली युद्धे संपली नसती, रोटरी नसती तर पूर, अवर्षण, दुष्काळ, कुपोषण यावर मात करणारे जगभरातील लाखो हात आणि मदतीचे खिसे उघडे झाले नसते. रोटरी तुम्हाला स्वतःच्या पलीकडे जाऊन समाजाचा विचार करायला शिकविते असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक डॉ. उदय निरगुडकर यांनी केले.

रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा नुकताच मातोश्री लॉन्स येथे उत्साही वातावरणात पार पाडला.यावेळी डॉक्टर निरगुडकर बोलत होते.प्रमुख अतिथी म्हणून आ डॉ किरण लहामटे तसेच रोटरी डिस्ट्रिक्ट 3132 चे असिस्टंट गव्हर्नर आर्किटेक रविकिरण डाके व अमोल वैद्य, नूतन अध्यक्ष अमोल देशमुख, उपाध्यक्ष किरण गजे, सेक्रेटरी गंगाराम करवर, सहसेक्रेटरी विजय पावसे, खजिनदार रोहिदास जाधव हे व्यासपीठावर उपस्थित होते.तर कार्यक्रमाला तालुक्यातील पत्रकार, शिक्षण ,सामाजिक,आर्थिक क्षेत्रातील मान्यवर,नागरिक व महिला मोठ्या पसंख्येने उपस्थित होते.

पुढे श्री निरगुडकर यांनी रोटरीने सांगितलेली चतुःश्रुती असेल याची जाणीव त्यांनी रोटरीच्या नवीन सदस्यांना करून दिली.

आपल्या तासभरापेक्षा अधिक वेळ चाललेले ओघवत्या शैलीतील भाषणाने त्यांनी उपस्थितांची मने जिंकली. विविध उदाहरणे देत किस्से सांगत अनुभव कथन करीत त्यांनी प्रेरणादायी विचार मांडत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. देश कसा कुस बदलत आहे, याची जाणीव त्यांनी उपस्थितांना प्रभावीपणे करून दिली.

आ. डॉ. किरण लहामटे यांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून वर्षभरात नेत्र तपासणी तसेच वृक्षारोपनाचे केलेल्या कामाचे कौतुक केले. नदी स्वच्छतेबाबत रोटरीने काम सुरू केल्यास आपल्याला रोटरी सोबत काम करायला आवडेल असे डॉ. लहामटे यांनी सांगितले.

**डॉ. निरगुडकर रोटरी क्लबच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने दिवसभर अकोले तालुक्यात होते.. अकोले तालुका त्यांना निश्चितच आवडला असेल.असे डॉक्टर लहामटे आपल्या भाषणात म्हणाले होते.. त्याचा संदर्भ देत डॉ. निरगुडकर म्हणाले की, हा भाग स्विझर्लंड च्या तोंडात मारेल इतका सुंदर आहे, तो स्वित्झर्लंड सारखा प्रेझेंट करण्यासाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर आपण उभे करावे अशी सूचना त्यांनी डॉ. लहामटे यांना केली. बीजमाता राहीबाई पोपेरे यांचे कार्य आपण सर्वप्रथम प्रकाशात आणले. त्यांची मुलाखतही आपण घेतली होती.. त्यानंतर त्यांना भारत सरकारने "पद्मश्री" हा पुरस्कार दिल्याची आठवणही डॉ. निरगुडकर यांनी सांगितली.**

रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल रविकिरण डाके यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.डी जी.सुधीर लातूर यांचा संदेशही त्यांनी वाचून दाखविला.

नूतन अध्यक्ष अमोल देशमुख यांनी आगामी वर्षभरात रोटरी क्लब च्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तर घनश्याम माने यांनी मागील वर्षात केलेल्या कार्याची पावती म्हून रोटरी क्लब अकोले ला पाच पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याचे सांगून मागील वर्षात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल सादर केला.

स्वागत रोटरी डिस्ट्रिक्टचे सहाय्यक प्रांतपाल अमोल वैद्य यांनी केले.सूत्रसंचालन दीपक महाराज देशमुख व घनश्याम माने यांनी केले. तर आभार सेक्रेटरी गंगाराम करवर यांनी मानले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळविणारी विद्यार्थिनी कुमारी प्रांजल प्रवीण धुमाळ तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील सायकलपटू विजय काळे यांचा यावेळी रोटरी क्लब च्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. तर उपस्थित मान्यवर नागरिकांचा जागेवर जाऊन सत्कार करण्यात आला व प्रातिनिधिक स्वरूपात जेष्ठ नेते दशरथराव सावंत यांचा सत्कार करण्यात आला. रोटरी क्लब मध्ये नव्याने सदस्य झालेल्यांचे मान्यवरांच्या हस्ते रोटरी पिन देऊन स्वागत करण्यात आले. रोटरी डिस्ट्रिक्ट वर निवड झालेल्या सचिन आवारी ,सचिन देशमुख, डॉ. रवींद्र डावरे यांचेही स्वागत करण्यात आले.मागील वर्षी नव्यानेच सुरू झालेल्या अगस्ति विद्यालयातील इन्ट्रॅक्ट क्लब सदस्यांचेही यावेळी स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी रोटरी क्लब अकोले सेंट्रलचे पदाधिकारी व सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# भिवंडीत मुसळधार पाऊस ; महापालिका प्रशासन सज्ज

## आयुक्त अनमोल सागर यांचे यंत्रणेला सतर्कतेचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : भिवंडी शहरात दि. 18.08.2025 रोजी 147 मी.मी. व 19.08.2025 रोजी दुपारी 03:00 पर्यंत 126 मी.मी. इतका पाऊस शहरामध्ये पडला. हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने तसेच आज सकाळी 10:00 वाजता ही भरतीची वेळ असल्याने प्रशासन याबाबत सतर्क होते. मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी सर्व अभियंते, प्रभाग अधिकारी, बिट निरीक्षक, आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांना सतर्क राहुन सकाळपासुन संभाव्य ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांचे पर्यवेक्षणाखाली सर्व अधिकारी/कर्मचारी हे शहरामध्ये आपत्कालीन परिस्थतीचा सामना करण्यासाठी सज्ज होते.

जर पाण्याच्या पातळीमध्ये वाढ झाली तर, नागरीकांना तातडीने स्थलांतरीत करण्याकरिता महानगरपालिकेच्या शाळांमध्ये व्यस्था केली आहे. शहरामध्ये काकूबाई चाळ, हंडी कंपाऊंड, आजमी नगर, संगमपाडा, म्हाडा कॉलनी येथे पाणी साचल्याने प्रशासनाने तेथील नागरीकांचा स्थलांतरीत होण्याच्या सुचना केल्या. मात्र नागरीक हे स्थलांतरीत होत नसल्याने प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू करुन नागरीकांची दुपारच्या जेवणाची व्यवस्था केली आहे. हंडी कंपाऊंड येथील 4 कुटूंबांना शाळा क्र. 39 येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

रात्रीच्या वेळी गरज भासल्यास सुमारे 3000 अन्नाच्या पाकीटांची व्यवस्था केल्याचे आपत्कालीन विभागप्रमुख श्री. शाकीब खर्बे यांनी सांगितले आहे. महानगरपालिकेचे सर्व अभियंते, प्रभाग अधिकारी, आरोग्य विभाग, आपत्कालीन विभाग हे प्रत्यक्ष घटनास्थळी वेळोवेळी उपस्थित असल्याने मोठ्या प्रमाणात पाऊस पडुन देखील महानगरपालिका क्षेत्रामध्ये कुठेही हानी झाल्याचे आढळून आले नाही. आपत्कालीन परिस्थतीत नागरीकांनी त्वरीत आपत्कालीन यंत्रणेशी संपर्क साधुन जवळच्या स्थलांतर केंद्रावर जाण्याचे आवाहन मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी केले आहे. तसेच, या नागरीकांकरिता राहण्याची व जेवणाची देखील व्यवस्था केली असून, नागरीकांनी कोणत्याही परिस्थतीत आपला जीव धोक्यात घालू नये असे देखील आवाहन केले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024